५) मागील वर्षी भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी जाहीर केलेल्या किमान प्रमाणापेक्षा जास्त असेल तर जास्तीत जास्त १५% पर्यंत लाभांश देता येईल.

**६०) हिशेब, नोंदी व लेखापरिक्षण :**

१) बँकेतील व्यवहाराबद्दलचे दप्तर व हिशेब मे.निबंधक, सहकारी संस्था व रिझर्व्ह बँक यांनी ठरवून दिलेल्या व मान्य केलेल्या नमुन्यात ठेवले जातील. बँकेचा कोणताही सभासद फक्त त्याचे स्वत:चे व्यवहाराविषयी हिशेब व रजिस्टर्स बँकेच्या कामकाजाचे वेळात पूर्वसुचनेनुसार वेळ ठरवून पाहू शकेल.

२) बँकेच्या हिशेबांचे लेखापरिक्षण मा.निबंधक यांनी मान्यता दिलेल्या लेखापरिक्षकांच्या यादीतील किंवा स्वत: बँकेने मान्यता दिलेल्या लेखापरिक्षकांच्या यादीतील लेखापरिक्षकांकडून प्रत्येक आर्थिक वर्षात किमान एकदा करण्यात येईल. सदर लेखापरिक्षणाचे मानधन ठरविण्याचा अधिकार बँकेस राहिल.

३) सदरचे लेखापरिक्षकांची नेमणूक व त्याकरीताचे मानधन यास वार्षिक साधारण सभेत मान्यता घ्यावी लागेल. तसेच त्याची पात्रता, अपात्रता, अधिकार, कर्तव्ये व जबाबदाऱ्या या रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार आणि कायद्यानुसार असतील.

**६१) बँकेची मोहर (सील) :**

बँकेचे एक मोहर (सील) तयार करण्यात येईल व ते मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे ताब्यात राहील. सदरहू मोहर (सील) एक संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष संचालक मंडळाचे ठरावाप्रमाणे वापरले जाईल.

**६२) पोटनियमाची दुरुस्ती :**

पोटनियमातीलदुरुस्ती, पोटनियमातील बदल अगर नवीन पोटनियम करणे हा विषय संचालक मंडळाच्या शिफारशीसह वार्षिक सर्वसाधारण/विशेष सर्व साधारण सभेपुढे मंजूरीसाठी ठेवणेत येईल.

१) पोटनियमातील कोणत्याही कलमामध्ये बदल करण्यासाठी किमान १४ दिवसाची पूर्वसुचना सभासदांना देणे आवश्यक आहे.

२) पोटनियमातील कोणत्याही कलमामध्ये बदल, दुरुस्ती, वाढ अगर रद्द करण्यासाठी सभेमध्ये एकूण हजर व मतदान करणाऱ्या २/३ सभासदांचे बहुमत आवश्यक राहील. त्याशिवाय कोणतीही दुरुस्ती करता येणार नाही.

३) उपरोक्त मंजूर झालेल्या पोटनियमांची अंमलबजावणी निबंधकाची लेखी मंजूरी आलेल्या तारखेपासून होईल.

**६३) शैक्षणिक प्रशिक्षण वर्ग :**

बँक वेळोवेळी सभासदा,कर्मचारी व संचालकांसाठी सहकारी प्रशिक्षण वर्ग आयोजित करेल व त्यासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध करुन देईल.